| सोलापूर विद्यापीठ | | Solapur University |
|---|---|---|
| अभ्यासमंडळे विभाग<br>सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर. ४१३ २५५<br>ईपीएबीक्स : ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स)<br>विस्तृत क्र. ११३ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०<br>संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>ई-मेल : bcud@sus.ac.in / bos@sus.ac.in | सोलापूर विद्यापीठ<br>॥ विद्यया संपन्नता ॥<br>NAAC Accredited-2015<br>'B' Grade (CGPA 2.62) | Board of Studies<br>Solapur-Pune National Highway,<br>Kegaon, Solapur-413 255<br>EPABX No. 0217- 2744778 (11 lines)<br>Ext. No. 113. Fax No.0217-2744770<br>Website : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>E-mail : bcud@sus.ac.in / bos@sus.ac.in |

संदर्भ क्र. सोविसो/अमंवि/२०१८/ 8025 दिनांक : 14 SEP 2018

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
(अभियांत्रिकी, फॉर्मसी, एम.बी.ए व आर्किटेक्चर महाविद्यालये वगळून)
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय :- २०१० पॅटर्नमधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत.**

संदर्भ १ दि.०७/०९/२०१८ रोजी झालेल्या सर्व विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता तसेच परीक्षा विभागातील यंत्रणा विश्लेषक, उपकुलसचिव यांची संयुक्त बैठकीतील ठराव क्र.१.

२ मंजूर कार्यालयीन टिपणी दि. ११/०९/२०१८.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन दि. ०७/०९/२०१८ रोजी झालेल्या सर्व विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता तसेच परीक्षा विभागातील यंत्रणा विश्लेषक, उपकुलसचिव यांची संयुक्त बैठकीत खालीलप्रमाणे ठराव क्र.१ पारित झालेला आहे.

| ठराव क्र. १ | २०१० पॅटर्नमधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याबाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.<br>१. अभियांत्रिकी, फार्मसी, शिक्षणशास्त्र, विधी हे अभ्यासक्रम व सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रम वगळून २०१० पॅटर्नमधील जे विद्यार्थी प्रथम वर्षास अनुत्तीर्ण झालेले आहेत. अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी कोणतीही संधी देऊ नये असे ठरले.<br>२. २०१० पॅटर्नमधील जे विद्यार्थी द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेशित आहेत पण ते प्रथम / तृतीय वर्षातील काही विषयात अनुत्तीर्ण आहेत. अशा विद्यार्थ्यांना ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०१८ व मार्च /एप्रिल २०१९ या दोनच संधी देण्यात याव्यात तथापि संबंधित विद्यार्थ्यांनी चालू अभ्यासक्रमानुसार (समकक्षतेनुसार) परीक्षा देणे बंधनकारक आहे तसेच सदर विद्यार्थ्यांना या नंतर कोणतीही संधी देऊ नये असे ठरले.<br>त्याचप्रमाणे संबंधित विद्यार्थ्यांकडून उपरोक्त नमुद केलेल्या दोन संधी नंतर परत कोणतीही संधी मागणार नाही अशा आशयाचे हमी पत्र प्राचार्यामार्फत विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावे.<br>३. २०१० पॅटर्नमधील द्वितीय वर्षास मार्क सिस्टीममध्ये परीक्षेला बसलेल्या विद्यार्थी वरीलप्रमाणे दिलेल्या दोन संधीत (ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०१८ व मार्च /एप्रिल २०१९) सर्व विषयात उत्तीर्ण न झाल्यास त्याची संबंधित अभ्यासक्रमाची संपादणूक (Performance) रद्द करावे असे ठरले.<br>४. २०१० पॅटर्नमधील जे विद्यार्थी मार्क. सिस्टीम तृतीय वर्षामध्ये आहेत अशा विद्यार्थ्यांना उपरोक्त नमूद संधीत (ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०१८ व मार्च /एप्रिल २०१९) तृतीय वर्ष पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर संधीत अनुत्तीर्ण झाल्यास सदर विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या संपादणूक (Performance) रद्द करण्यात येईल.<br>५. अनुक्रमाक १ ते ४ मध्ये दिलेल्या संधीस अनुसरुन परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी नविन अभ्यासक्रमानुसार समकक्षते नुसार परीक्षेस बसणे आवश्यक आहे.<br>६. **पॅटर्न २००९ व त्यापूर्वीच्या विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना** यापूर्वीच विशेष बाब म्हणून ऑक्टोंबर /नोव्हेंबर २०१७ व मार्च /एप्रिल २०१८ या दोन अधिकच्या संधी देण्यात आलेल्या होत्या तसेच सदर संधी देते वेळेस या संधीमध्ये मी अनुत्तीर्ण झाल्यास विद्यापीठाकडे सदर विषयामध्ये संधी मागणार नाही असे विद्यार्थ्यांनी स्वय:घोषणा पत्र घेण्याबाबत संबंधित प्राचर्यांना कळविण्यात आले होते.<br>वरील बाब विचरात घेता २००९ व त्यापूर्वीच्या विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना वरील प्रमाणे संधी देऊनही अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कोणतेही संधी देऊ नये असे ठरले. उपरोक्त प्रमाणे अनुक्रमाक १ ते ६ ची विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली. |
|---|---|

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की २०१० पॅटर्नमधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यासंदर्भात उपरोक्त ठराव क्र.१ मधील मुद्दा क्र. १ ते ६ नुसार कार्यवाही (अंमलबजावणी) करण्यात यावी. तसेच सदरची माहिती संबंधित विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील**
**विशेष कार्यासन अधिकारी**
शैक्षणिक, संशोधन आणि विकास

प्रत : मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.